# पञ्जो खन्धको


## १) सिगालसुत्त

**प्रस्तावना**

तथागत बुद्ध एकदा पहाटे राजगिरीमध्ये पिण्डपातासाठी जात असताना त्यांना सिगाल गृहपती नदीतील पाण्यात उभा राहून ओल्या कपड्याने सहादिशांना हात जोडून वंदन करताना दिसतो. त्याला 'काय करतोस'? असे तथागताने विचारले असता सिगाल गृहस्थ म्हणाला, की वडिलांनी मरतेसमयी सहा दिशांची पूजा करायला सांगितली आहे, तेच करतोय.

त्यावर बुद्ध त्याला त्याच्या वडिलांच्या शब्दांचे अर्थ समजावून सांगताना सहा दिशा कोणत्या आणि त्यांची पूजा कशी करायची हे स्पष्ट करतात. हुशार, सदाचारी, उद्योगी आणि आदर्श मित्र असणारा व्यक्ती यशस्वी होतो, हे स्पष्ट करतांना संग्रहाचे चार धम्मसुध्दा स्पष्ट करतात.

**'' पालकाने पाल्याचे योग्य पालन पोषण व शैक्षणिक संस्काराची संधी उपलब्ध करून देणे.''**



''मातापिता दिसा पुब्बा,आचरिया दक्खिणा दिसा।
पुत्तदारा दिसा पच्छा, मित्तामच्चा व उत्तरा''।।१।।

''दासकम्मकरा हेट्ठा, उध्दं समणबाह्मणा।
एता दिसा नमस्सेय्य, अलमत्तो कुले गिही''।।२।।

''पण्डितो सीलसम्पन्नो, सण्हो च पटिभानवा।
निवातवुत्ति अत्थद्धो, तादिसो लभते यसं''।।३।।

“उट्ठानको अनलसो, आपदासु न वेधति।
अच्छिन्नवुत्ति मेधावी, तादिसो लभते यसं”।।४।।

“सङ्गाहको मित्तकरो, वदञ्ञू वीतमच्छरो।
नेता विनेता अनुनेता, तादिसो लभते यसं”।।५।।

“दानञ्च पेय्यवज्जञ्च, अत्थचरिया च या इध।
समानत्तता च धम्मेसु, तत्थ तत्थ यथारहं”।।६।।

“एते खो सङ्गाह लोके, रथस्साणीव यायतो।
एते च सङ्गाह नास्सु, न माता।
लभेथ मानं पूजं वा, पिता वा पुत्तकारणा”।।७।।

“यस्मा च सङ्गाह एते, सम्मपेक्खन्ति पण्डिता।
तस्मा महत्तं पप्पोन्ति, पासंसा च भवन्ति ते” ति।।८।।

**(संदर्भ–दीघनिकायो पाथिकवग्गपालि)**

## शब्दार्थ

**नमस्सेय्य** – नमस्कार
**अलमत्तो**– पुरेशी मात्र/ प्रमाण
**सण्हो**– स्नेह
**निवातवुत्ति (वि.)**– विनम्र, अति लीन
**अत्थद्धो (वि.)**– अर्थ समजणारा, जाणणारा
**अनलसो (वि.)**– आळसरहित
**आपदासु (नपुं.)**– आपत्ती, संकट
**अच्छिन्नवुत्ति (वि.)**– निर्भयस्वभाव
**सङ्गाहको (वि.)**– संग्रह करणारा
**रथस्साणीव (पु.)**– रथवाहक
**यायतो (स्त्री.)**– जी कोणी, जेथून
**सम्मपेक्खन्ति (वर्त.क्रि.)**– तपासतात
**पप्पोन्ति (वर्त.क्रि.)** – मिळतात, पोहोचतात
**पासंसा (नपुं.)**– स्तुती, प्रशंसा

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पूर्व आणि उत्तर दिशा कोणासाठी सूचित केली आहे?
२) बायकोमुले आणि नोकरचाकर म्हणजे कोणती दिशा?
३) समण बाह्मण आणि आचरिय म्हणजे कोणती दिशा?
४) कोणास यश लाभते?
५) मेधावी माणसास कशामुळे यश लाभते?
६) चार सङ्गाह कोणते?
७) समाजात सङ्गाह नायक नसल्यास काय होईल?
८) आई वडिलांना सन्मान कशामुळे असतो?
९) हुशार व्यक्तीची प्रशंसा कशी होते?

## २. जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) पण्डितो | अ) अत्थद्धो |
| २) निवातवुत्ती | ब) अनालसो |
| ३) उट्ठानको | क) सीलसम्पन्नो |
| ४) अच्छिन्नवुत्ति | ड) मेधावी |
| | इ) धम्मेसु |

## ३. समास सोडवा.

१) मातापिता

२) पुत्तदारा

३) मित्तामच्चा

४) दासकम्मकरा

५) समणबाह्मणा

## ४. रूपे ओळखा.

१) वेधति

२) पप्पोन्ति

३) भवन्ति

४) पेक्खन्ति

## ५. रिकाम्या जागा भरा.


१) मातापिता दिसा,......आचरिया दक्खिणा दिसा। (पच्छा/पुब्बा)

२) दानञ्च, पेयवज्जञ्च अत्थचरिया च या......। (इध/एत्थ)


३) ''उट्ठानको......, आपदासु न वेधति। (अनलसो/ अलसो)

## ६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.

१)




२)




## ७. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) सिगालसुत्ताच्या आधारे सहादिशांची पूजा म्हणजे काय ते स्पष्ट करा.

२) सङ्गाह म्हणजे काय? ते स्पष्ट करून संग्रहामुळे समाजामध्ये प्रशंसा कशी होते ते सांगा.

☆☆☆